# WELFARE SCHEMES FOR THE TEACHING AND NON-TEACHING STAFF

The Y. B. Chavan College of Pharmacy was established under the aegis of Maulana Azad Educational Trust in 1989. The college is approved by AICTE and PCI New Delhi. The college provides all the welfare scheme to the staff as per Government of Maharashtra and AICTE. The following are the welfare schemes available for teaching and non-teaching staff:-

- Employee Provident Fund(EPF) Scheme
- Gratuity scheme.
- Maternity leave
- Paternity leave.
- Regular Health checkups of teaching and non-teaching staff
- General Insurance of non-teaching staff
- Fees concessions to wards of employees of Maulana Azad Educational Trust and Society

Duty Leave Note [ PPG]


डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद-४३१ ००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समिती तर्फे बी + दर्जा प्राप्त

दूरध्वनी : ५४०३३९९, २४०३४००
कार्यालय :
कुलसचिव (का.) २४०३३३३ (नि.)२४००२०३,२४०३३१०
फॅक्स : (०२४०) २४०३११३, २४०३३३५
तार : बामुसिटी
Web Site : WWW.bamuniversity.net
E-Mail : registrar@bamu.net

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद-४३१ ००४.
(महाराष्ट्र)


# :: परिपत्रक ::

मा. कुलगुरुंनी दिलेल्या आदेशा नुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेली अधिसुचना दिनांक ३० जुन २०१० अन्वये विहित केल्या प्रमाणे सर्व संलग्नीत महाविद्यालयातील नियमित अध्यापकांना खालील प्रमाणे किरकोळ रजा, विशेष किरकोळ रजा, अर्जित रजा, कर्तव्य रजा (डि. एल.), अभ्यास रजा, विश्रांतीकाळातील अभ्यास रजा, अर्धवेतनीय रजा, परिवर्तीत रजा, असाधारण रजा, आगाऊ रजा, प्रसुती रजा, बाल संगोपन रजा, पितृत्व रजा, कार्यालयीन कर्तव्य पार पाडण्यासाठी O. D. बाबत नियमात तरतुद आहे.

| अ. क्र. | रजेचा प्रकार | अनुज्ञेय रजा | रजा मंजूर करण्याची कारणे किंवा उद्देश |
|---|---|---|---|
| १ | कर्तव्य रजा<br>**(Duty Leave)** | ३० | १. विद्यापीठाच्या परवानगीने कॉन्फरन्स, सेमिनार, सेंपोसिया, कॉग्रेसेस, इत्यादी अटेन्ड करणेसाठी<br>२. विद्यापीठ किंवा संबंधीत संस्थेने निमंत्रित केल्या नंतर लेक्चर देण्यासाठी<br>३. विद्यापीठाने प्रतिनियुक्ती केल्या नुसार देशी / परदेशी / इतर संस्थेमध्ये काम करण्यासाठी<br>४. संबंधीत प्राधिकारणाने नियुक्त केल्यानुसार एखाद्या समितीवर काम करण्यासाठी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ५. विद्यापीठाने टाकलेल्या जबाबदारी नुसार काम करण्यासाठी .<br>६. यु. जी. सी., डी. एस. टी., एन. जी. ओ., शासन इत्यादी स्थरावरील बैठकीस हजर राहण्यासाठी. |
| २ | अभ्यास रजा (Study Leave) | दोन किंवा तीन वर्ष अभ्यासक्रमाच्या कालावधीनुसार | १. नविन नियुक्त झालेल्या व ज्यांची तिन वर्ष नियमित सेवा झालेली आहे अशा सहाय्यक प्राध्यापक, सहाय्यक ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण निदेशक, ग्रंथपाल, इत्यादी संवर्गासाठी अभ्यास व संशोधनासाठी प्रस्तुत रजा अनुज्ञेय राहील.<br>२. ज्या अध्यापकास निवृत्त होण्यासाठी ५ वर्षाचा कालावधी शिल्लक आहे अशा अध्यापकास अभ्यास रजा मंजूर करु नये.<br>३. संबंधीत अध्यापकास एका शैक्षणिक वर्षा मध्ये दोन पेक्षा जास्त किंवा त्यांच्या संपूर्ण सेव मध्ये ५ वर्षा पेक्षा जास्त अभ्यास रजा मंजूर करु नये.<br>४. संबंधीत अध्यापकास दोन वर्षापर्यंत अभ्यास रजा मंजूर करावी, सदरील रजा विद्यापीठाच्या परवानगीने एका वर्षा पर्यंत वाढवुन घेण्यास परवानगी असेल सदरील रजा पूर्ण वेतनासह अनुज्ञेय राहील. |
| ३ | विश्रांतीकाळातील अभ्यास रजा (Sabbatical Leave) | १ वर्ष | १. ज्या नियमित अध्यापकांची प्रपाठक / सहयोगी प्राध्यापक किंवा प्राध्यापक म्हणुन सात वर्षाची सेवा झालेली असेल अशा अध्यापकास अभ्यास किंवा संशोधनासाठी प्रस्तुत रजा अनुज्ञेय राहील परंतु सदरील रजा कालावधीत त्यांने केलेल्या अभ्यासाचा किंवा संशोधनाचा विद्यापीठास किंवा उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास मदत होणे अनिवार्य राहील.<br>२. सदरील रजा जास्तीत जास्त एक वर्ष किंवा त्यांच्या संपूर्ण सेवा कालावधीमध्ये संबंधीत अध्यापकास एकुण दोन वर्षा पेक्षा जास्त अनुज्ञेय राहणार नाही.<br>३. ज्या अध्यापकाने अभ्यास रजेचा लाभ घेतला असेल अशा अध्यापकास प्रस्तुत रजा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मिळावीच म्हणुन हक्क सांगता येणार नाही. |
| ४ | किरकोळ रजा (Casual Leave ) | ०८ | १. अनियोजित कामासाठी अचानक रजेवर जाण्यासाठी सदरील रजा अनुज्ञेय राहील किरकोळ रजेसोबत विशेष किरकोळ रजा वगळता इतर रजा सोबत जोडून घेणे अनुज्ञेय राहाणार नाही. |
| ५ | विशेष किरकोळ रजा (Special Casual Leave ) | १० | विद्यापीठ / महाराष्ट्र लोकसेवा आगोय / परीक्षा मंडळ / तत्सम प्राधिकरणाच्या परीक्षा घेण्यासाठी व शैक्षणिक संस्थाची तपासणी करण्यासाठी प्रस्तुत रजा अनुज्ञेय राहील. |
| ६ | अर्जित रजा | ६० | १. उच्च शिक्षण व प्रशिक्षण तसेच वैद्यकिय कारणास्तव अर्जित रजा अनुज्ञेय राहील तसेच महाराष्ट्र शासनाने निर्धारित केलेल्या नियमानुसार प्रस्तुत रजेचे निवृत्तीच्या वेळेस रोखीकरण करता येईल. |
| ७ | अर्धवेतनीय रजा (Half -Pay Leave) | २० | १. प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये नियमित शिक्षकास वैद्यकिय कारणास्तव प्रस्तुत रजा अनुज्ञेय राहील. |
| ८ | परिवर्तीत रजा (Commuted Leave) | २४० | नियमित शिक्षकास त्यांच्या संपूर्ण सेवा कालावधीमध्ये वैद्यकिय कारणास्तव प्रस्तुत रजा सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्व परवागीने मंजूर केल्या शिवाय अनुज्ञेय राहाणार नाही. |
| ९ | असाधारण रजा (Extra Ordinary Laeve) | ३ वर्ष | नियमित शिक्षकांच्या खाती कोणतीच रजा शिल्लक नसेल अशा वेळेस विनावेतन प्रस्तुत रजा अनुज्ञेय राहील. प्रस्तुत प्रकरणी संबंधीत शिक्षकांने वैद्यकिय कारणास्तव किंवा उच्च शिक्षणासाठी रजा घेतल्यास किंवा सक्षम अधिकाऱ्यांने मंजूर केल्यास फक्त वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय राहील.<br>असाधारण रजा त्यांच्या पुर्ण सेवा कालावधीमध्ये तीन वर्षा ऐवजी ५ वर्षा पर्यंत जास्तीत जास्त सक्षम अधिकाऱ्यांच्या परवानगीने नैसर्गिक कारणास्तव अनुज्ञेय राहील. प्रस्तुत रजा किरकोळ रजा विशेष किरकोळ रजा वगळता इतर रजेसोबत जोडुन घेता येणार नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | आगाऊ रजा (Leave Not Due) | ३६० | सक्षम अधिकाऱ्यास प्राप्त अधिकारात नियमित शिक्षकास वैद्यकिय कारणास्तव त्यांच्या खाती कोणतीच रजा शिल्लक नसेल अशा वेळेस पुढील कालावधीची रजा आगाऊ रजा म्हणुन उपभोगण्यास अनुज्ञेयं राहील. |
| ११ | प्रसुती रजा (Metrnity Leave ) | १८० | महिला शिक्षकास प्रसुती कारणास्तव सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या सल्यानुसार सदरील रजा संबंधीत महिला कर्मचाऱ्यास त्यांच्या संपूर्ण सेवा कालावधीमध्ये दोन वेळेस उपभोगण्यास अनुज्ञेय राहील सदरील रजा वैद्यकिय कारणास्तव अर्जित रजा अर्धवेतनीय रजा व असधारण रजे सोबत जोडून उपभोगण्यास परवानगी असेल. |
| १२ | बालसंगोपन रजा (Child Care Leave) | २ वर्ष | १. महिला शिक्षकास लहान मुलाचे संगोपन करण्यासाठी सदरील रजा अनुज्ञेय राहील प्रस्तुत रजेच्या कालावधीत विभागास अर्धवेळ किंवा गेस्ट लेक्चरर, यु. जी. सी. च्या पुर्व परवानगीने नियुक्त करण्यास मुभा असेल. |
| १३ | पितृत्व रजा (Paternity Leave) | १५ | प्रस्तुत रजा पुरुष शिक्षकास पितृत्व प्राप्त होणाऱ्या कालावधीसाठी एकुण दोन मुले / मुली मर्यादीत संख्ये पर्यंत अनुज्ञेय राहील. |
| १४ | **कार्यालयीन कर्तव्य पार पाडण्यासाठी मुख्यालय सोडुन इतर शासकीय कार्यालयामध्ये प्रतिनियुक्ती करणे (Office duty / O. D.)** | **मर्यादित संख्या लागु नाही.** | १. विद्यापीठाच्या / संस्थेच्या / प्राचार्यांच्या /शासनाच्या आदेशानुसार अध्यापक मुख्यालय सोडुन इतर शासकीय / निमशासकीय किंवा विद्यापीठा मध्ये कर्तव्य पार पाडण्यासाठी संबंधीत सक्षम अधिकारी कामाच्या आवश्यकतेनुसार सर्व संबंधीताची प्रतिनियुक्ती करेल. संबंधीत प्रतिनियुक्तीचा कालावधी, रजा कालावधी म्हणुन गृहीत धरता येणार नाही. सदरील कालावधी हा सेवेचा कर्तव्य कालावधी म्हणुन ग्राहय धरण्यात यावे, उदा :- विद्यापीठाच्या आदेशानुसार विविध प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित राहणे, परीक्षक म्हणुन कर्तव्य बजावणे, पेपरसेटर म्हणुन कर्तव्य बजावणे, शासकीय कार्यालयामध्ये, विभाग प्रमुखाच्या परवानगीने |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | बैठकीस उपस्थित राहने किंवा इतर तत्सम कार्याकरीता Office Duty म्हणुन कर्तव्य बजावणे अनुज्ञेय राहील. प्रस्तुत कार्यालयासाठी कर्तव्य बजावतांना उपरोक्त प्रमाणे अनुज्ञेय असणाऱ्या रजा संबंधीत कर्मचाऱ्याच्या खाती जमा असणाऱ्या रजेमधुन कपात करण्यात येवु नये. |

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ कलम १० (१) (२) (३) अन्वये उपरेक्त प्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या रजा हक्क म्हणुन मागता येणार नाही. रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी / अधिकारी कार्यालयाची किंवा लोकसेवेच्या निकडीची गरज लक्षात घेऊन रजा मंजूर करणे अथवा नाकारणे हा अधिकार संबंधीत समक्ष अधिकाऱ्यास असेल. तसेच प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र शासन अथवा विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेले सुधारीत आदेश सर्व संबंधीतांना लागु राहतील याचीही कृपया नोंद घेण्यात यावी, करीता तद्अनुषंगाने तथायोग्य कार्यवाही करणे बाबत, आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ
विकास मंडळ

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद.
संदर्भ क्र. : शैक्ष / संलग्न / व्हिव्हिए / २०११-२०१२ /36827-37230
दिनांक . ०५-०३-२०१२

**प्रतिलिपी :**

प्राचार्य / प्राचार्या, सर्व संलग्नीत महाविद्यालये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.